# गांव तलाव पाझर तलावाची कामे.:

गांव तलाव/ पाझर तलावाची कामे लघु पाटबंधारे विभाग जि.प.कडून केली जातात. गांव तलाव/पाझरतलावाची कामे मुख्यतः जलसंधारणासाठी घेतली जातात.५ द.ल.घ.फु. पेक्षा जास्त साठवणूकीच्या तलावांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असते. गांव तलावाची कमाल साठवण क्षमता २ द.ल.घ.फु.घेण्यात येते व ३ ते ५ द.ल.घ. फु.साठवण क्षमतेचे पाझर तलाव घेण्यात येतात. गांव तलाव/पाझर तलावात साठविलेले पाणी जमीनीखाली भुगर्भात जिरते त्यामुळे भुजल पातळी वाढून तलावाखाली विहिरीच्या पाणी पातळीत वाढ होते व या विहिरीव्दारे होणाया सिंचन क्षेत्रात वाढ होते.